शनिवार
१७
ऑक्टोबर २०२६

वर्ष १९ वे
अंक - २४५
पाने - ०६
किंमत - ४ रूपये

- Web : www.yuvavarta.in/com
- Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

- RNI No. MAHMAR/2007/24252

पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

महाराष्ट्रातील नामांकित
मुळचंद
होलसेल मिल डेपो
संगमनेर
डायरेक्ट मिल ते ग्राहक
लेडीज विअर । साडी सेक्शन
मो. 7498901766
दिवाळी धमाका
Scan for Location

Mulchand
Wholesale Mill Depo, Sangamner
डायरेक्ट मिल ते ग्राहक सेवा

मुळचंद होलसेल मिल डेपो, हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

कर्जाच्या हप्त्यासाठी धमकी; महिलेचा विनयभंग

मध्यस्थी करणाऱ्या वीटभट्टी मालकालाही मारहाण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : खासगी बँकेच्या कर्जाचा हप्ता भरण्यासाठी वारंवार फोन करून धमकावणे, घरी जाऊन अश्लील भाषेत शिवीगाळ करणे आणि महिलेचा हात धरून विनयभंग केल्याची धक्कादायक घटना संगमनेर तालुक्यातील पिंपरणे येथे घडली. या प्रकरणी निलेश सोपान देशमुख (रा. चैतन्य नगर, संगमनेर) याच्याविरुद्ध संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरणे येथील वीटभट्टीवर मजुरी करणाऱ्या आणि मूळच्या कोल्हार येथील रहिवासी असलेल्या ३५ वर्षीय महिलेने जानेवारी २०२६ मध्ये इक्विटास बँकेतून कर्ज घेतले होते. या कर्जाच्या हप्त्यावरून आरोपी निलेश देशमुख याने १३ ऑक्टोबर रोजी दिवसभरात वारंवार फोन करून महिलेकडे हप्ता भरण्यासाठी तगादा लावला. हप्ता न भरल्यास बघून घेण्याची, तसेच घरातील सामान उचलून नेण्याची धमकीही त्याने फोनवरून दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

दरम्यान, त्याच दिवशी सायंकाळी सातच्या सुमारास महिला घरी स्वयंपाक करीत असताना आरोपी त्यांच्या खोलीत आला. त्याने कर्जाच्या हप्त्याच्या कारणावरून महिलेला अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर महिलेचा हात धरून तिला जवळ ओढत तिचा विनयभंग केल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने आरडाओरड केली.

महिलेचा आवाज ऐकून जवळच असलेल्या वीटभट्टी मालकाने घटनास्थळी धाव घेत मध्यस्थी केली. मात्र, आरोपीने त्यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

पती घरी आल्यानंतर महिलेने त्यांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर महिलेने संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून निलेश सोपान देशमुख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

ज्ञानमाता विद्यालयात वाचन प्रेरणा दिन आणि जागतिक हात धुवा दिन साजरा





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ज्ञानमाता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज मध्ये दरवर्षी प्रमाणे भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर हा दिवस 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष, विद्यालयचे प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर, उपप्राचार्या अर्चना डोंगरे मॅडम पर्यवेक्षक फादर प्रशांत, यांनी डॉक्टर कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी पहिल्या तासाला वाचनाचे धडे गिरविले. डॉ. कलाम यांचे पुस्तकांवर अथांग प्रेम होते आणि त्यांनी आयुष्यभर ज्ञानाची साधना केली, म्हणूनच त्यांचा जन्मदिवस वाचन संस्कृतीला समर्पित करण्यात आला आहे. आजच्या डिजिटल युगात आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे तरुण पिढी पुस्तकांपासून दूर जात आहे. अशा वेळी विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजात पुन्हा एकदा पुस्तकांबद्दल आवड निर्माण करणे आणि वाचनाची संस्कृती टिकवून ठेवणे या दिवसाचे सर्वात मोठे महत्त्व आहे. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीतील श्रेया गुंजाळ हिने केले तर आदित्य गोडगे याने डॉ. ए.पी.जे. कलाम यांच्या जीवनकार्याची माहिती विद्यार्थ्यांसमोर सादर केली. त्याचबरोबर जागतिक हात धुवा दिनाचे औचित्य साधून हात धुण्याचे महत्त्व प्रा.श्री संदीप सातपुते यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. जेवणापूर्वी हात स्वच्छ धुतले तर ५०% आजार कमी होतात. साबणाने स्वच्छ हात कसे धुवावे याचे प्रात्यक्षिक देखील काही विद्यार्थ्यांनी सादर केले. कार्यक्रमासाठी प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर, उपप्राचार्या अर्चना डोंगरे, पर्यवेक्षक फादर प्रशांत शहाराव, व सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सार्वजनिक ठिकाणी फटाके वाजवण्यावर वर्षभर बंदी

सर्व उत्सवांसाठी मुंबई उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निर्देश

मुंबई (वृत्तसंस्था)

सण-उत्सवांच्या काळात सार्वजनिक ठिकाणी आणि रस्त्यांवर फटाके फोडण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. सार्वजनिक ठिकाणी तसेच सार्वजनिक रस्त्यांवर फटाके वाजवण्यावरील बंदी आता वर्षभरातील सर्व सण-उत्सवांना लागू राहणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दसरा, दिवाळी यांसह विविध सणांच्या काळात सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्याच्या प्रथेला आळा घालण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.



सणासुदीच्या काळात फटाक्यांमुळे होणारे ध्वनिप्रदूषण, वायुप्रदूषण तसेच संभाव्य दुर्घटनांचा प्रश्न वारंवार उपस्थित होतो. अनेकदा सार्वजनिक रस्त्यांवर आणि गर्दीच्या ठिकाणी फटाके फोडले जात असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या आदेशांचा पुनरुच्चार करत बंदीच्या अंमलबजावणीबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.

गणेशोत्सवाच्या काळात २२ सप्टेंबर रोजी दिलेल्या आदेशासंदर्भात गुरुवारी (दि. १५ ऑक्टोबर) पुन्हा सुनावणी झाली. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. यावेळी सार्वजनिक ठिकाणे आणि सार्वजनिक रस्त्यांवरील फटाके वाजवण्याची बंदी वर्षभर आणि सर्व सण-उत्सवांमध्ये लागू राहील, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला या आदेशाबाबत वर्तमानपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश दिले आहेत. नागरिकांपर्यंत न्यायालयाच्या आदेशाची माहिती प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आवश्यक असल्यास प्रसिद्ध व्यक्तींची, म्हणजेच सेलिब्रिटींची मदत घेण्याची सूचनाही करण्यात आली आहे. तसेच पोलिसांनी वॉर्ड स्तरावर यासंदर्भातील सूचना प्रसिद्ध करून नागरिकांना माहिती द्यावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

सुरक्षित आणि प्रदूषणमुक्त सणांसाठी महत्त्वाचे पाऊल

फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण कमी करणे, सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या संभाव्य दुर्घटना टाळणे आणि नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे, या दृष्टीने न्यायालयाचे निर्देश महत्त्वाचे ठरतात. मात्र, या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि नागरिकांचा सहभाग निर्णायक ठरणार आहे. त्यामुळे सण-उत्सव साजरे करताना सार्वजनिक सुरक्षितता आणि पर्यावरणाचे संरक्षण यांना प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचा निकाल जाहीर

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्राचा राज्य उत्सव अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या, 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' चा निकाल जाहीर झाला असून आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र मंडळ हाँगकाँग, एडोगावा इंडिया कल्चर सेंटर जपान, हेसन इंडियन लेडीज असोसिएशन अँड पायोनियर इंडियन्स ई.व्ही. यांचा अनुक्रमे प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक आला आहे. राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र समाज सेवा समिति उत्तराखंड, श्री राम युवक मंडळ कर्नाटक, गणराया गणेश उत्सव गुजरात यांचा अनुक्रमे प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक आणि राज्यस्तरावर मोरया गणेश मंडळ, सांगली, छत्रपती सार्वजनिक गणेश मंडळ दिपनगर नांदेड, स्वराज्य गणेश मंडळ देवनांद्रा यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकवला आहे. त्यांना अनुक्रमे साडे सात लाख, पाच लाख,अडीज लाख व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत एकूण ३५४ मंडळांनी सहभाग घेतला होता.

या वर्षी पहिल्यांदाच शासनाने 'वेलिंग-खातू गणेशमूर्तीकार' पुरस्काराची घोषणा केली असून त्या पुरस्काराचे प्रथम मानकरी राजन विष्णू पाटकर ठरले आहेत. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, शाल आणि अडीज लाख रुपये रोख इतके आहे. श्री. राजन विष्णु पाटकर हे पारंपरिक कौटुंबिक मूर्तीकलेचा वारसा पुढे नेणारे मूर्तीकार असून, त्यांच्या कुटुंबातील पूर्वजांपासून चालत आलेल्या कलेचे त्यांनी जतन केले आहे. भव्य, आकर्षक व भावपूर्ण गणेशमूर्तींच्या निर्मितीमध्ये त्यांचे विशेष योगदान आहे. मुंबईतील प्रसिद्ध गिरगावचा राजा या गणेशोत्सव मंडळाच्या मूर्तीनिर्मितीशी त्यांचे नाव संबंधित असून, भक्तिभाव आणि मूर्तीचे प्रभावी स्वरूप यांचा समन्वय त्यांच्या कलाकृतींमध्ये दिसून येतो. तसेच वडाळा राम मंदिर येथील प्रसिद्ध जी.एस.बी. सेवा मंडळाच्या महाकाय गणपती मूर्तीचे ते मुख्य मूर्तीकार असून गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ ते ही मूर्ती घडवित आहेत.

वेलिंग-खातू गणेशमूर्तीकार पुरस्कार तसेच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर, २०२६ रोजी दु.०३:०० वाजता रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे आयोजित करण्यात आला.

डिझेलच्या तुटवड्याचे सावट!

दिवाळीनंतर दरवाढीची शक्यता? इंधन बाजाराबाबत चिंता



नवी दिल्ली - जागतिक इंधन बाजारात डिझेलच्या संभाव्य तुटवड्याची चिंता वाढली असून, आगामी काळात इंधनाच्या किमतींवर दबाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आंतरराष्ट्रीय ऊर्जा एजन्सीच्या तेल बाजारविषयक अहवालाच्या पार्श्वभूमीवर डिझेलचा पुरवठा, जागतिक मागणी आणि इंधन दरांच्या हालचालींकडे लक्ष लागले आहे. डिझेलच्या टंचाईचे संकट २०२७ पर्यंत कायम राहू शकते, असा दावा समोर येत असल्याने वाहतूक क्षेत्रासह उद्योग आणि शेती क्षेत्रातही चिंतेचे वातावरण निर्माण होऊ शकते.

डिझेल हे मालवाहतूक, कृषी यंत्रसामग्री, बांधकाम आणि औद्योगिक क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे इंधन आहे. त्यामुळे जागतिक बाजारात डिझेलचा पुरवठा कमी झाल्यास त्याचा परिणाम वाहतूक खर्चावर होऊ शकतो. परिणामी, वस्तूंच्या वाहतुकीचा खर्च वाढून महागाईवरही दबाव निर्माण होण्याची शक्यता असते.

जागतिक बाजारातील डिझेलच्या किमती वाढल्यास देशांतर्गत इंधन दरांवरही परिणाम होण्याची शक्यता असते. मात्र, दिवाळीनंतर भारतात डिझेलचे दर मोठ्या प्रमाणात वाढणारच, असे निश्चितपणे सांगता येत नाही. देशांतर्गत इंधन दरांवर आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमती, रुपयाचे मूल्य, कररचना आणि तेल विपणन कंपन्यांची धोरणे यांसह विविध घटकांचा प्रभाव पडतो.

डिझेलच्या दरात वाढ झाल्यास ट्रक, मालवाहू वाहने, ट्रॅक्टर आणि अन्य डिझेलवर चालणाऱ्या यंत्रांचा वापर करणाऱ्यांना आर्थिक फटका बसू शकतो. आधीच उत्पादन खर्च आणि वाहतूक खर्चाच्या आव्हानांना सामोरे जाणाऱ्या शेतकरी, व्यापारी आणि लघुउद्योजकांसाठी ही परिस्थिती चिंताजनक ठरू शकते.

त्यामुळे आगामी काळात जागतिक इंधन बाजारातील घडामोडी, डिझेलचा पुरवठा आणि भारतातील इंधन दरांबाबतच्या अधिकृत घोषणांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तथापि, दिवाळीनंतर दरवाढ होण्याचा दावा किंवा २०२७ पर्यंत तुटवडा कायम राहण्याचा अंदाज यांची अधिकृत अहवालातील नेमक्या निष्कर्षांशी पडताळणी करणे आवश्यक आहे.

घरगुती गणेश देखाव्यांना दिलेले उत्तेजन ही कलापरंपरा जपण्याचा प्रयत्न - डॉ. संतोष खेडलेकर

आय लव्ह संगमनेरच्या उपक्रमाला मोठा प्रतिसाद



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर म्हणजे विविध कलांची परंपरा जपणारी भुमी. घरगुती गणेशमूर्तींसमोर भाविकांनी सादर केलेल्या देखाव्यातून त्यांची सर्जनशीलता आणि कलेप्रती असलेले प्रेम दिसून आले. या देखाव्यातून अनेक सामाजिक, व ऐतिहासीक घटनांना मूर्तरुप मिळाले. अशा देखाव्यांची दखल घेत, हर्षल काकड यांची आय लव्ह संगमनेर ही संस्था त्यांची स्पर्धा आयोजित करुन त्यातून कलेला देत असलेले प्रोत्साहन कौतुकास्पद असल्याचे गौरोद्गार लोककला अभ्यासक डॉ. संतोष खेडलेकर यांनी काढले. घरगुती गणेशोत्सव देखावे स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लोकनाट्य कलावंत पद्मश्री रघुवीर खेडकर होते.

ते म्हणाले की, संगमनेरला मोठी कलापरंपरा लाभली आहे. बिकट वाट वहिवाट नसावी.. धोपट मार्गा सोडू नको हा अजरामर फटका रचनारे शाहीर अनंत फंदी हे पहिले ज्ञात तमाशा कलावंत त्यांच्यापासून पवळाबाई हिवरगावकर, कांताबाई सातारकर ते रघुवीर खेडकर अशी लोककलेची समृध्द परंपरा संगमनेरला लाभली आहे. संगमनेरला नाट्यगृह नसल्याच्या काळात पेटिट हायस्कूलचे विद्यार्थी नाटके सादर करुन जमा होणारे पैसे सामाजिक कामाला देत असत. गुणोत्कर्ष हे तिकीटावर लावलेलं नगर जिल्ह्यातील पहिलं व्यावसायीक नाटक असल्याचे त्यांनी सांगितले. विद्या आणि कलेचं अधिष्ठान असलेल्या श्री गणेशाच्या समोर कलेचा प्रत्यय देणारे देखावे सादर करण्याची सर्जनशीलता अप्रतिम आहे. रघुवीर खेडकर यांनी सर्व संगमनेरकर माझ्या जिवाभावाचे असल्याचे सांगत आय लव्ह संगमनेरने आयोजित केलेल्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकातून हर्षल काकड यांनी हे या उपक्रमाचे सहावे वर्ष असून, आमच्यावर असलेल्या विश्वासातून या वेळी स्पर्धेसाठी दिड हजारांपेक्षा अधीक फोटो व व्हीडीओ आल्याचे सांगत, स्पर्धेच्या विजेत्यांसह या वेळी सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याची संधी मिळाल्याचे स्पष्ट केले. या स्पर्धेत संगमनेर रेल्वे या जिव्हाळ्याच्या विषयावर देखावे सादर करणाऱ्या ६ जणांना विशेष पुरस्कार देण्यात आला. तसेच गुणानुक्रमे १२ क्रमांक काढण्यात आले. या शिवाय गर्ल्स पॉवर हा देखावा व शाडू मातीतून साकारलेली गणेश मूर्ती यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. उत्तेजनार्थ बक्षिसांसह सुमारे ४० बक्षिसे या वेळी देण्यात आली. तर आठवड्यातील प्रत्येक रविवारी सार्वजनिक स्वच्छतेचा वसा घेतलेले सामाजिक कार्यकर्ते आदित्य घाडगे व त्यांच्या कन्येचाही या निमित्ताने सत्कार करण्यात आला.

लाडकी बहीण योजनेतून वगळलेल्या महिलांचे मानधन तातडीने सुरू करा

हजारो महिलांचा अकोलेत मोर्चा; मानधन २१०० रुपये करण्याची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून वगळलेल्या आणि मानधन बंद झालेल्या महिलांचे मानधन तातडीने सुरू करावे, ई-केवायसी प्रक्रिया पुन्हा सुरू करावी आणि मानधन दरमहा १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये करावे, या मागण्यांसाठी अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या वतीने आज अकोले येथे हजारो महिलांचा भव्य मोर्चा काढण्यात आला.

अकोले तालुक्यातील रासने संकुल येथून सुरू झालेल्या मोर्चाची शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. जनवादी महिला संघटनेच्या राज्य सचिव प्राची हतीवलेकर आणि सहसचिव प्रीती शेखर यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)चे राज्य सचिव डॉ. अजित नवले, सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, एकनाथ मेंगाळ आणि गणेश ताजणे यांनी मोर्चाला पाठिंबा दिला. सुमन विरणक, अनिता साबळे, संगीता साळवे, आराधना बोऱ्हाडे, निर्मला मांगे आणि हेमलता शेळके यांनी मोर्चासाठी मेहनत घेतली. मानधन अचानक बंद झाल्याबद्दल महिलांनी तीव्र संताप व्यक्त केला. मोर्चानंतर तहसीलदार सिद्धार्थ मोरे आणि महिला व बालविकास अधिकारी केडर नागरे यांना निवेदन देण्यात आले. मानधन पुन्हा सुरू करण्यासाठी अनेक महिलांनी अर्ज दाखल केले. उर्वरित महिलांचे अर्ज २२ ऑक्टोबर रोजी दाखल करण्यात येणार आहेत.

महिला घरात, शेतीत, पशुपालनात आणि काळजीवाहू कामांमध्ये वर्षभर बिनमोबदल्याचे श्रम करतात. भारतीय स्टेट बँकेच्या संशोधन विभागाच्या गणनेनुसार, महिलांच्या बिनमोबदल्याच्या घरगुती व काळजीवाहू कामाचे वार्षिक मूल्य सुमारे २२.७ लाख कोटी रुपये आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेतील मानधन ही सरकारची दया नसून महिलांच्या श्रमाच्या मूल्याची अंशतः परतफेड आहे, अशी भूमिका संघटनेने मांडली. निराधार सहाय्य योजनांचा लाभ घेणाऱ्या महिला, विधवा, वृद्ध आणि विविध शासकीय योजनांमध्ये तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळू नये. वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या पात्र श्रमिक महिलांना योजनेत समाविष्ट करावे.

ग्रामपंचायत रेडे ता. अकोले, जि. अहिल्यानगर ब -१ निविदा नोटीस

मा. सरपंच ग्रामपंचायत रेडे ता. अकोले जि. अहमदनगर या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील कामाच्या मोहरबंद ब-१ निविदा दोन लिफाफे पद्धतीनुसार यांच्यावतीने नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहेत. या कामाच्या कोऱ्या ग्रामपंचायत कार्यालय, रेडे येथे दिनाक १७/१०/२०२६ ते २६/१०/२०२६ ला ५.०० वाजेपर्यंत निविदा फी भरल्यास देण्यात येतील. मोहरबंद निविदा ग्रामपंचायत कार्यालय रेडे ता. अकोले येथे दिनांक २६/१०/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता स्वीकारण्यात येईल. व २७/१०/२०२६ ला सकाळी ११.०० वा उघडण्यात येईल.

अ. क्रं.	कामाचे नाव	निविदा रक्कम	बयाणा रक्कम	निविदा फी	निविदा रक्कम फी नोंदणीकृत ठेकेदाराचा वर्ग
१.	मौजे रेडे ता. अकोले येथे गावांतर्गत दुर्गा मंदिर रस्ता करणे.	४१९५३८/-	४१९५/-	३२४	मजूर संस्था

उपरोक्त कामाच्या निविदा कोणत्याही कारण न दाखविता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच. ग्रामपंचायत रेडे यानी राखून ठेवला आहे. ठेकेदार कोऱ्या निविदा संच्याचे अर्जासोबत अद्यावत नोंदणी दाखल्याच्या, पन क्रमांक जीएसटी क्र. आवश्यक सर्व कागदपत्र प्रति जोडणे आवश्यक आहे. कामावरील मजुरांना शासकीय विमा ठेकेदाराने आवश्यक अआहे. शासन निर्णयानुसार सु. वे. म. स. स. ला बयाना रक्कमेमध्ये सवलत आहे.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. रेडे, ता. अकोले, जि. अ.नगर

सरपंच
ग्रा.पं. रेडे, ता. अकोले, जि. अ.नगर

सरकार या महिन्यात संसदेचे विशेष अधिवेशन बोलावू शकते

नवी दिल्ली - केंद्र सरकार याच महिन्यात संसदेत परिसीमन आणि महिला आरक्षणावर विशेष अधिवेशन बोलावू शकते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, सरकार या विषयाशी संबंधित विधेयके पुन्हा पुढे आणू इच्छिते. सूत्रांचे म्हणणे आहे की, सरकारला सभागृहातील आपल्या संख्याबळावर विश्वास आहे. विशेष अधिवेशन बोलावण्याच्या सुमारे एक आठवडा आधी त्याची माहिती दिली जाऊ शकते. संसदेचे पावसाळी अधिवेशन १३ ऑगस्ट रोजी संपले होते, मात्र अद्याप त्याचे सत्रावसान करण्यात आलेले नाही.संसदेच्या पावसाळी अधिवेशनाची शेवटची बैठक १३ ऑगस्ट रोजी झाली होती. त्यानंतर दोन महिने उलटूनही अधिवेशन औपचारिकरित्या समाप्त झाल्याची घोषणा झालेली नाही.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेमुळे महिलांच्या पंखाला बळ

एकविराच्या माध्यमातून टेलरिंग व आरी वर्क प्रशिक्षण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून महिलांना गृहउद्योग व व्यवसायासाठी व्यासपीठ मिळावे याकरता ७५ महिलांना टेलरिंग व २५ आरी वर्क प्रशिक्षण देण्यात आल्या असून या माध्यमातून या महिलांना स्वयंरोजगाराच्या साठी बळ मिळाले आहे. यशोधन कार्यालय येथे टेलरिंग व आरी वर्क प्रशिक्षण पूर्ण केलेल्या १०० महिलांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी डॉ.नितीन भांड, रामदास तांबडे, प्रशिक्षक श्रीमती शिला करंजेकर, दिव्या मयूर काळे, समन्वयक शर्मिला हांडे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ.जयश्रीताई थोरात यांनी एकविरा फाउंडेशनच्या माध्यमातून तालुक्यातील महिलांना व युवतींना रोजगार व स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण मिळावे याकरता टेलरिंग व आरी वर्क चे प्रशिक्षण क्लास यशोधन कार्यालय परिसरात सुरू केले आहे. या क्लास मधून आत्तापर्यंत तालुक्यातील ५५० महिलांनी प्रशिक्षण पूर्ण केले असून नव्याने ७५ महिलांनी टेलरिंग व २५ महिलांनी दीड महिन्यांचे आरिवर्क प्रशिक्षण पूर्ण केले आहे. या माध्यमातून रोजगारासाठी त्यांना बळ मिळाले आहे. यावेळी बोलताना शीला करंजेकर म्हणाल्या की, महिलांनी कुटुंबाची जबाबदारी कायम सांभाळली आहे. आर्थिक स्रोत निर्माण करण्यासाठी घरगुती व्यवसाय स्वयंरोजगार हा अत्यंत गरजेचा झाला आहे जेणे करून आपण कुटुंबाला हातभार लावू शकतो. याचबरोबर सातत्याने कामात राहिल्याने महिलांचे आरोग्य ही चांगले राहते डॉक्टर जयश्रीताई थोरात यांनी सुरू केलेल्या या उपक्रमांमधून अनेक महिलांना व्यवसाय व स्वयंरोजगाराची मोठी संधी आणि व्यासपीठ निर्माण झाले असल्याचे त्या म्हणाल्या.

डॉ. नितीन भांड म्हणाले की, यशोधन कार्यालय हे जनसेवेच्या विश्वासाचे कार्यालय आहे. नागरिकांच्या विविध प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी यशोधनच्या माध्यमातून लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने प्रयत्न होत असून महिलांसाठीही स्वयंरोजगाराची चांगली संधी एकविरा फाउंडेशनने निर्माण करून दिले असल्याचे ते म्हणाले.

तर शर्मिला हांडे म्हणाल्या की, महिलांच्या स्वयंरोजगार बरोबर डॉक्टर जयश्रीताई थोरात यांनी महिलांच्या आरोग्यासाठी मोठे काम केले आहे. गावोगावी सातत्याने आरोग्य शिबिर होत असून महिलांची तपासणी केली जात आहे. ज्या महिलांमध्ये तपासणी मध्ये काही आढळल्यास एसएमबीटी ट्रस्टच्या माध्यमातून महिलांना आरोग्याबाबतचे मार्गदर्शन व मोफत उपचार केले जातात.

खून प्रकरणातील आरोपीस जामीन मंजूर

डीएनए अहवाल अद्याप अप्राप्त; बचाव पक्षाच्या युक्तिवादानंतर आरोपीला जामीन मंजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - डिसेंबर २०२५ मध्ये मुळा नदीच्या काठावर, घारगावजवळील आंबी खालसा परिसरात एक अज्ञात मृतदेह आढळून आल्याने घारगाव परिसरात खळबळ उडाली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. शवविच्छेदन अहवालातून मृतकाची गळा दाबून हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर घारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३७०/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर घारगाव पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास करत प्रकरणाचा उलगडा केला आणि डिसेंबर २०२५ मध्ये तीन आरोपींना अटक केली. पुढील तपासाअंती फेब्रुवारी २०२६ मध्ये आरोपी प्रकाश जाधव यांच्यासह अन्य दोन आरोपींविरुद्ध खून व पुरावा नष्ट केल्याचे आरोप ठेवून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. या प्रकरणातील आरोपी प्रकाश जाधव हे १० महिन्यांहून अधिक काळ कारागृहात राहिल्यानंतर त्यांनी ॲड. शोण दिपक थोरात यांचे मार्फत न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. त्यानंतर संगमनेर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश व्ही. एच. पाटवदकर यांनी दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी आदेश पारित करत आरोपीची जामिनावर सुटका केली आहे.

आरोपी प्रकाश जाधव यांच्या वतीने ॲड. शोण थोरात यांनी जामीन अर्ज दाखल करून न्यायालयात युक्तिवाद केला. उपलब्ध पुराव्यातील त्रुटी आणि अद्याप प्राप्त न झालेल्या डीएनए अहवालाकडे बचाव पक्षाने न्यायालयाचे लक्ष वेधले. आरोपीला गुन्ह्याशी थेट जोडणाऱ्या पुराव्यांच्या अनुषंगाने बचाव पक्षाने मांडलेले मुद्दे सुनावणीदरम्यान महत्त्वाचे ठरले. बचाव पक्षाचा युक्तिवाद आणि प्रकरणातील उपलब्ध बाबींचा विचार करून जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश व्ही. एच. पाटवदकर यांनी आरोपी प्रकाश जाधव यांचा जामीन अर्ज मंजूर केला. त्यामुळे दिर्घकाळ कारागृहात असलेल्या आरोपीला दिलासा मिळाला आहे. या प्रकरणात ॲड. शोण थोरात यांना ॲड. प्रमोद शिंदे आणि ॲड. आकाश जाधव यांचे सहकार्य लाभले. खूनासारख्या गंभीर गुन्ह्यातही प्रत्येक आरोपीच्या भूमिकेचा, उपलब्ध पुराव्यांचा आणि कायदेशीर बाबींचा स्वतंत्रपणे विचार करून न्यायालय निर्णय घेत असते, हे या प्रकरणातील जामीन आदेशातून स्पष्ट झाले.

कुंकुमार्चन विधीने महिलांना प्रचंड मनःशक्तीचा लाभ- आ. अमोल खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - 'जीवनातल्या सर्वच क्षेत्रात महिला जोरदार घोडदौड करीत आहेत. अनेक अडथळे दूर करून आपल्या यशाचा झेंडा गगनात उचा फडकवीत आहेत. घवघवीत यश संपादन करण्यासाठी कणखर मनाची आवश्यकता असते. कुंकुमार्चन विधीच्या माध्यमातून मनाची एकाग्रता, शांती समाधान आणि तृप्ती प्राप्त होते. संगमनेरच्या हजारो महिला वर्षानुवर्षे अत्यंत श्रद्धेने या विधीत सहभागी होऊन देव देश आणि धर्माच्या कामासाठी अधिकाधिक उर्जेने सज्ज होतात ही अभिमानाची गोष्ट आहे' असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ पाटील यांनी येथे केले.

शारदीय नवरात्राचे औचित्य साधून प्रतीवर्षीप्रमाणे संगमनेर पुरोहित संघाच्या वतीने सामुहिक कुंकुमार्चन सोहळ्याचे मालपाणी लॉन्स च्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या सोहळ्याला महिलांची प्रचंड उपस्थिती होती.

व्यासपीठावर विशेष निमंत्रित म्हणून आमदार खताळ,सौ. नीलमताई खताळ, मालपाणी उद्योग समूहाच्या संचालिका रचना मालपाणी यांच्यासह पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, सौ. कांचनताई बाळासाहेब थोरात, सौ.दुर्गाताई तांबे, आर्दीसह पुरोहित संघाचे अध्यक्ष भाऊ जाखडी, उपाध्यक्ष संदीप वैद्य,अरुण कुलकर्णी, अनिल मुळे, उमेश जोशी, विशाल जाखडी, सागर काळे, दत्तात्रय बल्लाळ, अनिल शेटे, अभय देशपांडे, पवन काळे, प्रकाश शेटे, प्रतिक जोशी, शंतनू जाखडी, आदित्य कुलकर्णी, बापू दाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभास मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि माल्यार्पण करून तुळजाभवानी मातेच्या प्रतिमेचे वेदमंत्रांच्या घोषात विधीवत पूजन करण्यात आले. यावेळी महिलांनी महालक्ष्मी माता, अंबा माता, भवानी माता, तुळजा भवानी माता व सप्तशृंगी मातांच्या जयघोषाने सभागृह दणाणून सोडले. यावेळी बोलताना आमदार खताळ यांनी पुरोहित प्रतिष्ठानच्या चौफेर सामाजिक कार्याचा गौरव केला.

यावेळी बोलताना नीलम ताई खताळ म्हणाल्या की 'महिलांच्या प्रगतीला आदिशक्तीचे आशीर्वाद म्हणजे कुंकुमार्चन विधी आहे. यातून महिलांना नवचेतना मिळते' अत्यंत सुंदर साध्या सोप्या शैलीत त्यांनी महिलांशी संवाद साधल्याने त्यांच्या भाषणाला अनेकदा महिलांनी टाळ्यांचा जोरदार प्रतिसाद दिला.

संगमनेरमध्ये पुरोहित संघ अनेक वर्षांपासून महिलांना शक्ती देण्याचे कार्य करीत आहे. धार्मिक कार्यात तर संघ अग्रेसर आहेच मात्र आरोग्य, शिक्षण, वृक्षारोपण , प्रदूषण नियंत्रण, स्वच्छता अभियान असे सर्वांगीण कार्य करून संघाने आदर्श निर्माण केलेला आहे. भारतीय संस्कृती सारखी संस्कृती जगात नाही. इतकी सुंदर सर्व समावेशक संस्कृती दुसरी कुठे नाही' असे प्रतिपादन मालपाणी उद्योग समूहाच्या संचालिका सौ. रचनाभाभी मालपाणी यांनी येथे केले.

पोलीस उपअधीक्षक सोनवणे यांनी आपल्या भाषणात त्यांनी संगमनेरचा उपक्रम शील पुरोहित संघ म्हणजे समाजासाठी झटणारी एक आदर्श संस्था असल्याचे गौरवोद्गार काढले. यावेळी सौ. तांबे यांनी माझ्या नगराध्यक्ष पदाच्या काळात संगमनेर पुरोहित संघाने अनेक सामाजिक कार्यात नगरपालिकेला सहकार्य केले. असे गौरवद्गार सौ तांबे यांनी काढले.

लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरतर्फे 'जागतिक शांतता' विषयावर भव्य चित्रकला स्पर्धा

गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : विद्यार्थ्यांमध्ये जागतिक शांततेचे महत्त्व रुजविण्यासह त्यांच्या कलागुणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी लायन्स क्लब ऑफ संगमनेर सॅफ्रॉन सफायरतर्फे 'जागतिक शांतता' या विषयावर भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे हे १८ वे वर्ष असून, रविवार, १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता कॉलेज रोड येथील मालपाणी लॉन्स, संगमनेर येथे ही स्पर्धा होणार आहे. विद्यार्थ्यांसाठी स्पर्धेतील प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे.

जागतिक स्तरावर शांतता, बंधुभाव, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश चित्रकलेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीला रंगांच्या माध्यमातून अभिव्यक्त करावे, तसेच बालवयापासूनच त्यांच्या मनात शांतता आणि सामाजिक सलोख्याचे संस्कार रुजावेत, या हेतूने लायन्स क्लब ऑफ संगमनेर सफायर सातत्याने हा उपक्रम राबवत असल्याचे संस्थापक अध्यक्ष गिरीश मालपाणी व माजी अध्यक्ष श्रीनिवास भंडारी यांनी सांगितले.

स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांचे पाच गट करण्यात आले असून, प्रत्येक गटातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक एक हजार रुपये व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक ७०० रुपये व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक ५०० रुपये व प्रमाणपत्र, तर चतुर्थ, पाचवे आणि उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून प्रत्येकी २०० रुपये व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. अशा प्रकारे एकूण १४ हजार रुपयांची पारितोषिके वितरित केली जाणार आहेत.

स्पर्धेसाठी चित्र पूर्ण करण्याकरिता दोन तासांचा कालावधी देण्यात येणार आहे. चित्रासाठी आवश्यक ड्रॉइंग शीट आयोजकांकडून उपलब्ध करून दिली जाणार असून, रंग, पेन्सिल आणि इतर चित्रकला साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणायचे आहे. वॉटरकलर, क्रेयॉन, पेन्सिल कलर यांसारख्या विविध माध्यमांचा वापर करून विद्यार्थ्यांना आपली कलाकृती साकारता येणार आहे. या स्पर्धेला मालपाणी ग्रुप, संगमनेर यांचे सौजन्य लाभले आहे. प्रकल्प प्रमुख म्हणून सुनीता मालपाणी, डॉ. जितेंद्र पाटील, देविदास गोरे आणि निशांत काळे काम पाहत आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्लबचे अध्यक्ष जितेश लोढा, सचिव नम्रता अभंग आणि खजिनदार चंद्रशेखर गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली क्लबचे पदाधिकारी व सदस्य प्रयत्नशील आहेत.

प्रकल्प समितीमध्ये गिरीश मालपाणी, श्रीनिवास भंडारी, महेश डांग, अतुल अभंग, धनंजय धुमाळ, कल्याण कासट, उमेश कासट, सुदीप हासे, अक्षय गोरले, व्यंकटेश अमृतवाड, नितीन नवले, चैतन्य काळे, चेतन जोर्वेकर, गिरीश गांधी, कल्पेश मर्दा, संतोष अभंग, चिंतन शाह, स्वाती लोढा, अंजली पाटील, सोनल गोरले, चैताली जोर्वेकर, प्रिती काळे, अनन्या धुमाळ, पूजा कासट, प्रियंका कासट, मिनल अभंग, सुचित्रा कुटे, पायल शाह, प्रियंका हासे आणि वैष्णवी काळे यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करावे आणि 'जागतिक शांतता' हा संदेश अधिक व्यापक स्तरावर पोहोचविण्यास हातभार लावावा, असे आवाहन लायन्स क्लब ऑफ संगमनेर सफायरच्या वतीने करण्यात आले आहे.

नगरपालिका उर्दू शाळा क्र. ४ मध्ये डॉ. कलाम जयंती उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर शहरातील घासबाजार परिसरातील नगरपालिका प्राथमिक उर्दू शाळा क्र. ४ येथे भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची ९५ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचे स्मरण केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय जनता पार्टी अल्पसंख्याक मोर्चाचे अहिल्यानगर उत्तर जिल्हाध्यक्ष श्री. रऊफ शेख होते. यावेळी भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष बबलू काझी, जिल्हा सचिव इरफान मन्सुरी, इस्माईल बेग, माजिद अत्तार, संगमनेर शहराध्यक्ष शाकीर शेख, शाळेच्या मुख्याध्यापिका परवीन पठाण यांच्यासह अफरोजा मोमीन, सुमैय्या शेख, रिजवाना शेख आदी शिक्षकवृंद उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनप्रवासावर, वैज्ञानिक योगदानावर, देशभक्तीवर आणि शिक्षणाविषयीच्या विचारांवर आपले मनोगत व्यक्त केले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सर्वोच्च यश संपादन करणाऱ्या डॉ. कलाम यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे मांडले.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना रऊफ शेख म्हणाले, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे जीवन म्हणजे जिद्द, मेहनत, शिस्त आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या बळावर यशाची सर्वोच्च शिखरे गाठण्याचा आदर्श आहे. अत्यंत सामान्य परिस्थितीतून पुढे येत त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि कर्तृत्वाच्या जोरावर देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदापर्यंत मजल मारली. त्यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि ती पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करण्याचा संदेश दिला.

ते पुढे म्हणाले की, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हे सर्वांत प्रभावी माध्यम आहे. विशेषतः अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाला प्राधान्य देऊन आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन क्षेत्रात आपला ठसा उमटवावा.

भाजपा अल्पसंख्याक मोर्चाच्या वतीने जिल्हाभरात जयंती साजरी भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, प्रदेश उपाध्यक्ष सलीम बागवान आणि प्रदेश महामंत्री एजाज शेख यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच राज्याचे पालकमंत्री तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सुजयदादा विखे पाटील आणि जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या नेतृत्वाखाली, जिल्हाध्यक्ष रऊफ शेख यांनी जिल्ह्यातील विविध ठिकाणी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी केली.

दादाजी भुसे यांची शाळेला भेट

विद्यार्थ्यांना नियमित वाचनाचे आवाहन


फोटो - पराग कुलकर्णी, मुंबई

मुंबई (पराग कुलकर्णी)

चला शाळेत जाऊया' अभियानांतर्गत शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक २३, किसन नगर येथे भेट दिली. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी विद्यार्थ्यांकडून वाचन करून घेत त्यांनी 'वाचन प्रेरणा दिना'चे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून ज्ञान, कल्पनाशक्ती आणि विचारक्षमता वाढवावी, असे आवाहन त्यांनी केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे याच शाळेचे माजी विद्यार्थी असल्याचा उल्लेख करत मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही राज्याच्या नेतृत्वापर्यंत पोहोचता येते, हा संदेश त्यांनी अधोरेखित केला. यावेळी महापालिका अधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मान्यवर शाळेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

संपादकीय...

प्रत्येक थेंबासाठी आजच नियोजन हवे!

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकट पुन्हा एकदा गंभीर बनत असताना पाण्याचे महत्त्व नव्याने अधोरेखित होत आहे. संगमनेर तालुक्यासह अनेक भागांत दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी वाढत आहेत. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांसाठी चारा आणि पाणी, शेतीचे नुकसान आणि रोजगाराचा प्रश्न अशा अनेक समस्यांनी ग्रामीण जीवनाला विळखा घातला आहे. या पार्श्वभूमीवर केवळ टँकरने पाणीपुरवठा करणे किंवा तात्पुरत्या उपाययोजना राबविणे पुरेसे ठरणार नाही. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन आजच केले, तरच उद्याच्या संकटाची तीव्रता कमी करता येईल. दुष्काळ पडल्यावर प्रशासनाची धावपळ सुरू होते. टँकरची मागणी, पाणीपुरवठ्याचे नियोजन, चारा छावण्यांचे प्रस्ताव आणि मदतीसाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजविण्याची वेळ नागरिकांवर येते. मात्र, पाणीटंचाईची तीव्रता वाढल्यानंतरच उपाययोजनांना सुरुवात करायची का, हा मूलभूत प्रश्न आहे. पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता, भूजलपातळीतील घट आणि जलसाठ्यांची स्थिती यांचा वेळेवर आढावा घेतला, तर संभाव्य संकटाचा अंदाज घेऊन पूर्वतयारी करणे शक्य आहे. संकट आल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा संकट येण्यापूर्वी नियोजन करणे, हीच सुशासनाची खरी कसोटी आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा नागरिकांच्या जगण्याशी संबंधित आहे. त्यामुळे टँकरची मागणी करणाऱ्या गावांना अनावश्यक कागदपत्रे, विलंब आणि प्रशासकीय अडथळ्यांचा सामना करावा लागू नये. टंचाईग्रस्त गावांची वस्तुनिष्ठ पाहणी करून गरजेनुसार पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विशेषतः वाड्या-वस्त्यांवरील नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या पाण्याच्या गरजांकडे संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. पाणीपुरवठ्याच्या नियोजनात राजकीय भेदभावाला किंवा अनावश्यक विलंबाला स्थान असता कामा नये. दुष्काळाचा परिणाम केवळ पिण्याच्या पाण्यापुरता मर्यादित राहत नाही. जनावरांसाठी चारा आणि पाण्याची कमतरता निर्माण झाली, तर शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटात आणखी भर पडते. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे चारा उपलब्धता, चारा छावण्यांची आवश्यकता, जनावरांसाठी पाण्याची व्यवस्था आणि चारा उत्पादनाचे नियोजन यांचा एकत्रित विचार करावा लागेल. त्याचबरोबर शेतकरी आणि शेतमजुरांच्या हाताला काम मिळावे, यासाठी रोजगार हमीच्या कामांना गती देणे आवश्यक आहे. नाला खोलीकरण, बंधारे, जलसंधारण आणि पावसाचे पाणी अडविणारी कामे रोजगारनिर्मितीबरोबरच भविष्यातील पाणीटंचाई कमी करण्यासही मदत करू शकतात. मात्र, प्रत्येक वर्षी दुष्काळ निवारणासाठी खर्च होणारा निधी आणि प्रत्यक्षात निर्माण होणारी जलसाठवण क्षमता यांचाही आढावा घेतला पाहिजे. किती बंधारे बांधले, किती नाले खोलीकरण केले, किती गावांमध्ये पाणी उपलब्ध झाले आणि भूजलपातळीत किती सुधारणा झाली, याचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. केवळ कामांची संख्या मोजून जलसंधारणाचे यश ठरत नाही; पावसाचे पाणी किती अडविले आणि त्याचा नागरिकांना किती फायदा झाला, हे महत्त्वाचे आहे. जलसंधारणासाठी गावपातळीवर लोकसहभाग वाढविणेही तितकेच गरजेचे आहे. ग्रामपंचायती, ग्रामस्थ, शेतकरी, सहकारी संस्था, सामाजिक संघटना आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे गावाचा जलआराखडा तयार करावा. उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण, पावसाचे पाणी साठविणे, भूजल पुनर्भरण, पाण्याचा काटकसरीने वापर आणि पाणी वाया जाण्याचे प्रमाण कमी करणे यासाठी सामूहिक प्रयत्न झाले पाहिजेत.`.

विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकावर कथन करणे हा अभिनव उपक्रम - डॉ. तांबे



संगमनेर (प्रतिनिधी)--सोशल मीडियाच्या युगामध्ये विद्यार्थी आणि युवक वाचनापासून दूर जात आहे. वाचन हा जीवनभराचा अनमोल ठेवा असून त्यामधूनच माणसाला खरे शहाणपण येत असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज वाचनाची सवय जोपासली पाहिजे असे प्रतिपादन सह्याद्री संस्थेचे अध्यक्ष मा. आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले आहे. याचबरोबर वाचलेल्या पुस्तकांवर विद्यार्थ्यांनी केलेल्या कथन करणे हा अभिनव उपक्रम असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात सभागृहात सह्याद्री विद्यालय व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने विद्यार्थ्यांनी वाचन केलेल्या पुस्तकांचे कथन या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ लेखक प्रा. विठ्ठल शेवाळे, नानासाहेब खर्डे, डॉ. सागर गोपाळे, डॉ विकास करंजेकर, साहित्यिक व लेखक प्रा. संदीप वाकचौरे, मुख्याध्यापक एस एम खेमनर, उप मुख्याध्यापक श्रीमती सुरेखा राहणे, प्रा. नामदेव कहांडळ , पर्यवेक्षक अण्णासाहेब दिघे, मीणानाथ जोर्वेकर, मिलिंद आवटी, समन्वयक तुषार गायकर, उज्वला घुले आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी याकरता सह्याद्री विद्यालयातील ग्रंथपाल तुषार गायकर यांनी विविध वाचन गट तयार केले आहेत. दररोज विद्यार्थ्यांना ग्रंथालय मध्ये नेऊन वेगवेगळ्या पुस्तकांबाबत ते मार्गदर्शन करतात. वाचन दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी वाचन केलेल्या पुस्तकांवर कथाकथन करण्याचा अभिनव उपक्रम त्यांनी राबवला. यामध्ये जानवी टांगळ हिने महान वैज्ञानिक गुणाकार मुळे, दिया गायकवाड हिने एका कल्पक जगाचा विचार, वैष्णवी आहेर हिने पळती झाडे, अर्जुन रेवगडे याने चार्ल्स डार्विन, दिशा म्हस्कुले हिने आयटी विश्वातील अनभिशिक्त सम्राट, रोहिणी उगले हिने श्यामची आई, मानसी आरोटे हिने डॉ आयडा स्कडर या पुस्तकांवर कथाकथन केले.

यावेळी बोलताना मा आमदार डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, भारतरत्न डॉ अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने पुस्तकावर कथाकथन करण्याचा हा अत्यंत अभिनव उपक्रमातून यामधून वाचन चळवळीला चालना मिळणार आहे. डॉ.अब्दुल कलाम हे विचारवंत, शास्त्रज्ञ, लेखक, कवी होते, लहानमुलांप्रती त्यांना प्रचंड प्रेम होते. वाचाल तर वाचाल हे अत्यंत बरोबर आहे कारण वाचनाने शहाणपण येते. सध्या सोशल मीडिया दूरदर्शन असे वेगवेगळे माध्यमे आहेत परंतु सकाळी काय झाले ते संध्याकाळी माणूस विसरून जातो पण जे लोक वाचतात ते आयुष्यभर ते भांडवल जगतात खऱ्या अर्थाने वाचनाने शहाणपण येत असते. विद्यार्थ्यांनी छोट्या छोट्या गोष्टींचे पुस्तके, विज्ञानवादी यांचे वाचन करावे. वाचनाने भविष्यात तुम्हाला सगळ्यात मोठी समृद्धी मिळणार असल्याचे ते म्हणाले.

तर प्रा. विठ्ठल शेवाळे म्हणाले की, सह्याद्री विद्यालयाने विद्यार्थ्यांमध्ये वाचन आवडण्यास विविध उपक्रम सुरू केले असून हे अत्यंत दिशादर्शक आहे.तर तुषार गायकर म्हणाले की सह्याद्री विद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये हजारो पुस्तके असून अनेक लहान मुले विद्यार्थी शिक्षक पुस्तक वाचत असतात पुस्तकांची आदान प्रदान करतात आम्ही वाचन गट केले असून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये त्या पुस्तकाविषयी मांडण्याची उत्सुकता निर्माण होते.

यावेळी संदीप वाकचौरे म्हणाले की, वाचक कमी होत असताना विद्यार्थ्यांमध्ये वाचण्याची आवड निर्माण करण्याचा सह्याद्री विद्यालयाचा उपक्रम स्तुत्य आहे.

जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वाचन प्रेरणा दिन



संगमनेर - जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या उपप्राचार्य माधुरी शेवाळे यांनी स्वागतपर भाषण केले.

दिलीप उदमले यांनी विद्यार्थ्यांशी इंग्रजीतून संवाद साधत अब्दुल कलामांचा जीवनपट ओघवत्या शैलीत मांडला.

तसेच वाचनाचे महत्व, पुस्तके वाचनातून आपण कसे समृद्ध होतो ते शशांक गंधे यांनी त्यांच्या मनोगतातून व्यक्त केले.साहित्यिक मंडळाच्या वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमाचे प्रकल्प प्रमुख ज्ञानेश्वर गोंटे यांनी प्रास्ताविक केले व मंडळाच्या सर्व सदस्यांचा परिचय करुन दिला.निधी कोल्हे आणि अर्णव कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी सूत्र संचलन केले.

यावेळी प्रसिद्ध व्यंगचित्रकार अरविंद गाडेकर यांनी रेषातुन व्यंगचित्र साकारली,त्यांच्या प्रबोधनपर व्यंगचित्रातून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले.शेवटी शाळेच्या प्राचार्या जिज्ञासा कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. सुरेश परदेशी यांनी गीत सादर केले. यावेळी संगमनेर साहित्यिक मंडळाचे मेजर लक्ष्मण ढोले, ज्ञानेश्वर राक्षे, ज्ञानेश्वर गोंटे, विजय दीक्षित, शेख ईद्रीस, रमेशकाका सराफ, विश्वनाथ ठाकरे, नेहे सर, चारूदत्ता काटकर, डॉ.जी.पी.शेख, बाळकृष्ण महाजन, मुकुंद डांगे,सुरेश परदेशी हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प प्रमुख प्राचार्य ज्ञानेश्वर गोंटे व संगमनेर साहित्यिक मंडळाचे सचिव ज्ञानेश्वर राक्षे व उपाध्यक्ष व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये रोजगाराची संधी!
भरती सुरू आहे
कृषी क्षेत्रात काम करण्याची संवर्णसंधी!
पदाचे नाव:-फिल्ड कॉर्डिनेटर - २
कामाचे स्वरुप:-
शेतकऱ्यांबरोबर समन्वय साधणे,शेतकऱ्यांच्या शेतीविषयक मार्गदर्शन व समन्वय,शेतकरी गट/ सभासदांशी नियमित संपर्क ठेवणे, कंपनीच्या कृषीविषयक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे
शैक्षणिक पात्रता
पदवीधर/कृषी पदविका/तत्सम शैक्षणिक पात्रता शेती विषयक कामाचा अनुभव असणे गरजेचे
वयोमर्यादा, २५ ते ३५ वर्षे कार्यस्थळ,संगमनेर तालुका
ईच्छुक उमद्वारांनी बायोडाटा पुढील नंबरवर दि. १८/१०/२०२६ व्हॉटसॲप किंवा इमेलवर पाठवावा. संपर्क:9850119046
Email:ens.krishivikasfpc@gmail.com
कृषी क्षेत्रात काम करण्याची आवड आणि शेतकऱ्यांसोबत काम करण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांनी आजच अर्ज करावा!

भाड्याने देणे आहे
टॉप टेन इम्पेरिअल (रिलायन्स डिजीटल) मध्ये ग्राउंड फ्लोअरचे दोन शॉप किंवा ऑफिस भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909

पाहिजेत
ध्येय फायनान्स संगमनेर
Branch manager BM-1
Branch devlopment Menegar BDM- 1
Sales devlopment MenegarSDM - 1
Telicaller - 2 M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
9370773504
7768079272

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
०२४२५
२२५१२९

२ बीएचके फ्लॅट्स उपलब्ध!
पत्ता
SBI कॉलनीजवळ, जनता नगर, संगमनेर
संपर्क क्रमांक:
9850569862
9834825883

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME IS MUSKAN HAROON PATHAN
TO NEW NAME AS MUSKAN HARUN PATHAN
UIDAI 772022796096
ADRESS - GAVTHAN, SAMNAPUR, SANGAMNER 422605

पाहिजेत
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य)
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ ॲण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

पाहिजेत
अकाऊंटंट - 2 जागा
कॅशिअर - 2 जागा
सेल्समन - १० जागा (पु.)
सेल्समन - १० जागा (म.)
वॉचमन - २ जागा
आकर्षक पगार दिले जाईल
मुळचंद होलसेल मिल डेपो
अकोले रोड, सेलिब्रेशन हॉटेल समोर, संगमनेर
7498901766

ग्रामपंचायत राळेगण सिद्धी ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ब -१ निविदा नोटीस

प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. राळेगण सिद्धी, ता. पारनेर जि.अहिल्यानगर यांचेकडून खालील कामांचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा. बा. विभाग यांचे कडील नोंदणीकृत सीलबंद ब १ दोन किंत्राटदारांकडून लफाफा पद्धतीने ब १ निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्रं.	कामाचे नाव	योजना	निविदा विक्री	बयाणा रक्कम	निविदा रक्कम	कामाची मुदत	वर्गवारी
१.	मौजे राळेगण सिद्धी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र राळेगणसिद्धी करीता पाईपलाईन करणे	१५ वा वित्त आयोग	२३६/-	--	१४०७६५/-	६ महिने	सु.बे.

कामाच्या शर्ती व अटीबाबतची माहिती ग्रामपंचायत **राळेगण सिद्धी** कार्यालयात **दि.** १७/१०/२०२६ **ते दि.** २३/१०/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सीलबंद निविदा **दि.** २३/१०/२०२६ रोजी संध्याकाळी ठीक ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटी शर्ती बाबत माहिती ग्रा. पं. **राळेगण सिद्धी** येथे उपलब्ध आहे. दरपत्रक स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार प्रशासक/ग्रामपंचायत अधिकारी **राळेगण सिद्धी** यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि.** २६/१०/२०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता ग्रामपंचायत **राळेगण सिद्धी** ता. पारनेर जि. अ.नगर येथे पार पडेल. निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जीएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब १ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅम्प पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु. बे. साठी सुरूवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सुट राहील. नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅम्प पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबेसाठी प्रमाणपत्रावर सुटचा उल्लेख असणे गरजेचे आहे) व निविदा फी भरलेली पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. राळेगण सिद्धी, ता. पारनेर, जि. अ.नगर

प्रशासक
ग्रा.पं. राळेगण सिद्धी, ता. पारनेर, जि. अ.नगर

ग्रामपंचायत शहापूर केकती ता. नगर, जि. अहिल्यानगर ब -१ निविदा नोटीस

प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. शहापूर केकती, ता. नगर, जि.अहिल्यानगर यांचेकडून खालील कामांचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा. बा. विभाग यांचे कडील नोंदणीकृत सीलबंद ब १ दोन किंत्राटदारांकडून लफाफा पद्धतीने ब १ निविदा मागविण्यात येत आहे.

अ. क्रं.	कामाचे नाव	योजना	निविदा विक्री	बयाणा रक्कम	निविदा रक्कम	कामाची मुदत	वर्गवारी
१.	मौजे शहापूर येथे कचरी संकलसाठी ट्रॉली पुरवणे	१५ वा वित्त आयोग	२३६/-	१%	४९२०००/-	६ महिने	खुला

कामाच्या शर्ती व अटीबाबतची माहिती ग्रामपंचायत **शहापूर केकती** कार्यालयात **दि.** १७/१०/२०२६ **ते दि.** २३/१०/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सीलबंद निविदा **दि.** २३/१०/२०२६ रोजी संध्याकाळी ठीक ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटी शर्ती बाबत माहिती ग्रा. पं. **शहापूर केकती** येथे उपलब्ध आहे. दरपत्रक स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार प्रशासक/ग्रामपंचायत अधिकारी **शहापूर केकती** यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि.** २६/१०/२०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता ग्रामपंचायत **शहापूर केकती** ता. नगर, जि. अ.नगर येथे पार पडेल. निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जीएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब १ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅम्प पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु. बे. साठी सुरूवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सुट राहील. नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅम्प पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबेसाठी प्रमाणपत्रावर सुटचा उल्लेख असणे गरजेचे आहे) व निविदा फी भरलेली पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. शहापूर केकती, ता. नगर, जि. अ.नगर

प्रशासक
ग्रा.पं. शहापूर केकती, ता. नगर, जि. अ.नगर

प्रो.फी.
दि. १७/१०/२०२६
ने. ता. २१/११/२०२६

ॲड.आर. बी. जोशी
संगमनेर कोटी, संगमनेर
निशानी नं.

जाहीर नोटीस
मे. ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट साहेब, वर्ग -१ संगमनेर

क्रि. चौ.अर्ज नं. ६०६/२०२६

बबन बाळकृष्ण गिते
वय -४५ वर्षे, धंदा- शेती
रा. गिते वस्ती, पिंप्री लौकी अजमपूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

यांचे कोर्टात
---- अर्जदार

विरुद्ध

१) ग्रामसेवक मौजे पिंप्री लौकी अजमपूर-
ग्रामपंचायत पिंप्री लौकी अजमपुर
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

२) पंचायत समीती संगमनेर
ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

--- सा. वाले

ज्याअर्थी अर्जदाराची बहिण श्रीम. शर्मिला बाळकृष्ण गिते रा. पिंप्री लौकी अजमपुर, ता. संगमनेर, जि.अ.नगर, हिचा जन्म दि. १९/०८/१९७७ रोजी पिंप्री लौकी अजमपुर, ता. संगमनेर, जि.अ.नगर येथे झालेला असून सदर जन्माची नोंद सा.वाले यांचेकडील जन्म-मृत्यू रजिस्टरला तशी नोंद होणेकामी व त्याकामी सा. वाले यांचे विरुध्द तसा हुकुम होणेकामी सदरचा चौकशी अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

तरी सदर चौकशी अर्जाबाबत कोणत्याही व्यक्तीचे कुठल्याही स्वरुपाचे हक्कसंबधं, तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याचे आत किंवा दिनांक २१/११/२०२६ रोजी मे. कोर्टाने नेमलेल्या तारखेस स्वतःअगर त्यांचे अधिकृत प्रतिनिधीमार्फत या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा अर्जदार यांनी सदर चौकशी अर्जात मागणी केल्याप्रमाणे मे. कोर्टाचा अर्जाचे गुणदोषावर हुकुम होईल. आज दि. १७/१०/२०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी दिले.

हुकुमावरून
क. लिपीक
कामगिरी क्लार्क

सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर
संगमनेर

शुद्धीपत्रक

ग्रामपंचायत गव्हाणेवाडी तालुका श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर ही जाहीर निविदा दिनांक १५.१०.२०२६ रोजी दैनिक युवावार्ता या दैनिकांमध्ये प्रकाशित झाली असून या जाहिरातीमध्ये अटी व शर्ती मध्ये सरपंच व ग्रामपंचायत असे झाले असून ते व प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी असे वाचावे तसेच ग्रामपंचायतीची नजरचुकीने नाव निंबवी असे झाले असून ते गव्हाणेवाडी असे वाचावे.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. गव्हाणेवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अ.नगर

प्रशासक

शुद्धीपत्रक

ग्रामपंचायत बाभूळवाडे तालुका पारनेर जिल्हा अहिल्यानगर ही जाहीर निविदा दिनांक १५.१०.२०२६ रोजी दैनिक युवावार्ता या दैनिकांमध्ये प्रकाशित झाले असून या जाहिरातीमध्ये अटी व शर्ती मध्ये सरपंच व ग्रामपंचायत असे झाले असून ते प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी असे वाचावे.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. बाभूळवाडे, ता. पारनेर, जि. अ.नगर

प्रशासक

शुद्धीपत्रक

ग्रामपंचायत सारोळा तालुका पारनेर जिल्हा अहिल्यानगर ही जाहीर निविदा दिनांक १५.१०.२०२६ रोजी दैनिक युवावार्ता या दैनिकांमध्ये प्रकाशित झाले असून या जाहिरातीमध्ये अटी व शर्ती मध्ये नजरचुकीने सरपंच व ग्रामपंचायत असे झाले असून ते प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी असे वाचावे

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. सारोळा, ता. पारनेर, जि. अ.नगर

प्रशासक

शुद्धीपत्रक

ग्रामपंचायत देसवडे तालुका पारनेर जिल्हा अहिल्यानगर ही जाहीर निविदा दिनांक १५.१०.२०२६ रोजी दैनिक युवावार्ता या दैनिकांमध्ये प्रकाशित झाले असून या जाहिरातीमध्ये अटी व शर्ती मध्ये नजरचुकीने सरपंच व ग्रामपंचायत असे झाले असून ते प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी असे वाचावे.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं. देसवडे, ता. पारनेर, जि. अ.नगर

प्रशासक

शुद्धीपत्रक

ग्रामपंचायत जवळा तालुका पारनेर जिल्हा अहिल्यानगर ही जाहीर निविदा दिनांक १५.१०.२०२६ रोजी दैनिक युवावार्ता या दैनिकांमध्ये प्रकाशित झाले असून या जाहिरातीमध्ये अटी व शर्ती मध्ये नजरचुकीने सरपंच व ग्रामपंचायत असे झाले असून ते प्रशासक/ ग्रामपंचायत अधिकारी असे वाचावे.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रा.पं.जवळा, ता. पारनेर, जि. अ.नगर

प्रशासक





पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



संगमनेरमध्ये राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व आदर्श शाळा पुरस्कारांचे रविवारी वितरण

राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त सोमनाथ कळसकर गुरुजींचा अभीष्टचिंतन सोहळा आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शिक्षकांच्या शैक्षणिक योगदानाचा गौरव, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी झटणाऱ्या शाळांचा सन्मान आणि शिक्षण क्षेत्रातील प्रेरणादायी कार्याचा जागर करण्यासाठी राष्ट्रपती पारितोषिकप्राप्त आदर्श शिक्षक सोमनाथ कळसकर गुरुजी प्रतिष्ठाणच्या वतीने रविवारी (दि. १८ ऑक्टोबर) राज्यस्तरीय आदर्श शिक्षक व आदर्श शाळा पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याच कार्यक्रमात प्रतिष्ठाणचे प्रेरणास्थान सोमनाथ तात्याबा कळसकर गुरुजी यांचा अभीष्टचिंतन सोहळाही साजरा करण्यात येणार आहे.



हा कार्यक्रम रविवारी सकाळी १० वाजता संगमनेर येथील नाशिक-पुणे महामार्गावरील मालपाणी लॉन्स येथे होणार आहे. शिक्षणतज्ज्ञ तथा गीता परिवाराचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार असून, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षक सोमनाथ कळसकर गुरुजी प्रतिष्ठाणचे अध्यक्ष रामनाथजी कळसकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

यंदाच्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जामखेड तालुक्यातील देवदैठण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनगर वस्तीचे शिक्षक लहु विक्रम बोराटे आणि माजलगाव तालुक्यातील आनंदगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक नारायण राजेसाहेब झोडगे यांची निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी केलेल्या कार्याचा या पुरस्कारांच्या माध्यमातून गौरव करण्यात येणार आहे.

राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कारासाठी पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वडगाव आनंद आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भापकर वस्ती यांची निवड करण्यात आली आहे. शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीचे प्रयत्न आणि शाळांनी निर्माण केलेला आदर्श यांचा या निमित्ताने सन्मान होणार आहे.

या सोहळ्यात कु. वैष्णवी किशोर अभयेकर (सी.ए.) यांचाही विशेष सत्कार करण्यात येणार आहे. शिक्षक आणि शाळांच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच समाजातील गुणवंतांचा सन्मान करण्याची परंपरा या कार्यक्रमातून जपली जाणार आहे. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन देणे, आदर्श शाळांच्या उपक्रमांची माहिती समाजापर्यंत पोहोचविणे आणि नव्या पिढीला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रेरणा देणे, हा या उपक्रमामागील महत्त्वपूर्ण उद्देश आहे. या पुरस्कार सोहळ्याला शिक्षक, शिक्षणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा. ज्ञानेश्वर गोन्टे, दीपक थेटे, डॉ. योगिता कळसकर, गणेशलाल बाहेती, किसन भाऊ हासे, ॲड. मितेश जोंधळे, ॲड. संग्राम जोंधळे, अमोल वैद्य आणि ॲड. रंजना गवांदे यांच्यासह प्रतिष्ठाणचे पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.

चिमुरडीवर अत्याचार, नराधमास थेट फाशी

नाशिक (प्रतिनिधी)

संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील साडेचार वर्षांच्या चिमुकलीवरील लैंगिक अत्याचार व हत्या प्रकरणात मालेगाव अप्पर जिल्हा व सत्र न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला आहे. या प्रकरणातील दोषी विजय ऊर्फ शेखर खैरनार (वय २४) याला न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. तसेच पीडितेच्या कुटुंबीयांना शासनाकडून १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ज्येष्ठ विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी ही माहिती दिली. अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश के. जी. पालदेवार यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी झाली. आरोपीला अपहरण, पोक्सो कायद्यांतर्गत लैंगिक अत्याचार, पुरावे नष्ट करणे आणि हत्या या गुन्ह्यांमध्ये दोषी ठरवण्यात आले होते. शिक्षेच्या मुद्द्यावर झालेल्या युक्तिवादानंतर न्यायालयाने त्याला फाशीची शिक्षा सुनावली.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य सरकारने ॲड. उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली होती. त्यांनी न्यायालयात सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निवाड्यांचे दाखले देत सुमारे ५० मिनिटे युक्तिवाद केला. आरोपी गावातील लहान मुलांमध्ये परिचित होता. या विश्वासाचा गैरफायदा घेत त्याने चिमुकलीला चॉकलेटचे आमिष दाखवून सोबत नेल्याचे सरकारी पक्षाने न्यायालयात मांडले.

१६ नोव्हेंबर रोजी बालिका इतर मुलांसोबत खेळत असताना आरोपी तिला घेऊन गेला. त्यानंतर तिच्यावर अत्याचार करून गळा दाबून हत्या केल्याचा आरोप होता. मृतदेह मोबाईल टॉवरच्या तारांच्या कुंपणाजवळ टाकून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे तपासात समोर आले.

या खटल्यात सरकारी पक्षाने एकूण २४ साक्षीदार तपासले. बालिकेसोबत खेळणाऱ्या सात वर्षांच्या मुलाची साक्ष, एका स्थानिक महिलेची प्रत्यक्षदर्शी साक्ष आणि वैद्यकीय पुरावे महत्त्वाचे ठरले. पोलिसांनी अवघ्या तीन आठवड्यांत दोषारोपपत्र दाखल केले होते. गेल्या दहा महिन्यांपासून जलदगती न्यायालयात या खटल्याची सुनावणी सुरू होती. सुनावणीदरम्यान पीडितेचे आई-वडील नियमितपणे न्यायालयात उपस्थित राहत होते. मुलीच्या आठवणींनी व्याकूळ झालेल्या वडिलांनी आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली होती. अखेर न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावल्यानंतर पीडित कुटुंबीयांना दिलासा मिळाला. मनोधैर्य योजनेअंतर्गत आणि न्यायालयीन आदेशानुसार कुटुंबाला १० लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आल्याची माहिती ॲड. निकम यांनी दिली.

दोस्तीत गद्दारीचा संशय; मित्रालाच गोळ्या घालून संपविले, आरोपींना पोलीस कोठडी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - जवळच्या नात्यातील मुलीसोबत प्रेमसंबंध ठेवण्याच्या संशयातून दोन मित्रांनी आपल्याच मित्राची गोळ्या झाडून हत्या केल्याची धक्कादायक घटना अकोले तालुक्यातील पेढेवाडी शिवारात उघडकीस आली आहे. भोरू सोमा कातोरे (वय ३२, रा. दगडवाडी, ता. अकोले) असे मृत तरुणाचे नाव आहे. त्याची हत्या केल्यानंतर आरोपींनी मृतदेह जंगलात नेऊन पाला-पाचोळ्याखाली लपविल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. या प्रकरणी धोंडू सोमा पथवे (रा. दगडवाडी) आणि नवनाथ नारायण कुलाळ (रा. पेढेवाडी) या दोघांना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, भोरू कातोरे, धोंडू पथवे आणि नवनाथ कुलाळ हे तिघेही एकमेकांचे चांगले मित्र होते. मात्र, भोरू याचे आरोपींच्या जवळच्या नात्यातील एका मुलीसोबत प्रेमसंबंध असल्याचा संशय आरोपींना होता. संबंधित कुटुंबाच्या संपर्कात राहणे, त्यांच्या घरी जाणे आणि वेगवेगळ्या कारणांनी जवळीक साधण्याचा प्रयत्न करणे, अशा भोरूच्या हालचालींवर आरोपींचे लक्ष होते.

भोरूच्या वागण्याबाबत माहिती मिळाल्यानंतर दोन्ही आरोपींनी त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केल्याचे समजते. मात्र, भोरूने आपले कोणाशीही प्रेमसंबंध नसल्याचे सांगत आरोप फेटाळल्याचे पोलिसांच्या तपासातून पुढे आले आहे. तरीही त्याच्या वागण्यात बदल होत नसल्याचा संशय आरोपींना होता. या कारणावरून त्यांच्यातील वाद वाढत गेला आणि त्यातूनच भोरूचा काटा काढण्याचा कट रचल्याचा संशय पोलिसांना आहे.

१२ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारच्या सुमारास आरोपींनी भोरूला विश्वासात घेऊन वाहनातून बाहेर नेले. त्यानंतर तिघांनी एका ठिकाणी मद्यपान केले. पुढे ते भोरूला पेढेवाडी शिवारातील घनदाट जंगलात घेऊन गेले. तेथे त्याला त्याच्या कथित वर्तनाबाबत जाब विचारण्यात आला. त्यानंतर दोन्ही आरोपींनी त्याला मारहाण केली आणि गावठी पद्धतीच्या बंदुकीतून बरगडीच्या खालच्या भागात गोळ्या झाडून त्याची हत्या केल्याचा आरोप आहे.

हत्या केल्यानंतर हा प्रकार कोणाला समजू नये, या उद्देशाने आरोपींनी भोरूचा मृतदेह जंगलातील एका ठिकाणी नेऊन टाकला आणि त्यावर पाला-पाचोळा पसरवून तो लपविण्याचा प्रयत्न केला. मात्र, भोरूचे वाहन घटनास्थळाजवळच बेवारस अवस्थेत राहिले. त्यानंतर दोन्ही आरोपी तेथून पसार झाले. भोरू घरी परतला नसल्याने त्याच्या कुटुंबीयांची चिंता वाढली. दोन दिवस उलटूनही त्याचा शोध लागत नसल्याने त्याचा भाऊ मनाजी सोमा कातोरे यांनी अकोले पोलिसांकडे तो बेपत्ता असल्याची माहिती दिली. पोलिसांनी बेपत्ता असल्याची नोंद घेऊन तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांना भोरूचे वाहन बेवारस अवस्थेत आढळले. तसेच, भोरू बेपत्ता झालेल्या दिवशी तो धोंडू पथवे आणि नवनाथ कुलाळ यांच्यासोबत दिसल्याची माहिती काही व्यक्तींनी दिली. पोलिसांनी या माहितीच्या आधारे दोघांचा शोध घेतला असता ते घरी आढळून आले नाहीत. त्यामुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला.

दरम्यान, भोरूच्या शवविच्छेदन अहवालातून त्याची हत्या झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी पुढील कारवाई वेगाने केली.

पोलिसांची कारवाई; १७ गोवंशीय जनावरांची सुटका

आयशर वाहनासह १२ लाखांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

लोणी- कत्तलीसाठी अवैधरीत्या वाहतूक केली जात असल्याचा संशय असलेल्या १७ गोवंशीय जनावरांची लोणी पोलिसांनी सुटका केली. नगर-मनमाड महामार्गावरील निर्मळ पिंपरी शिवारात गुरुवारी (दि. १५ ऑक्टोबर) पहाटे ही कारवाई करण्यात आली. यावेळी १५ जर्सी गायी आणि दोन गोऱ्यांची सुटका करण्यात आली असून, जनावरांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या आयशर वाहनासह एकूण ११ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे.

लोणी पोलीस ठाण्याचे पथक महामार्गावर रात्रीची गस्त घालत असताना हॉटेल सतलजसमोर काळ्या ताडपत्रीने झाकलेली विटकरी रंगाची टाटा आयशर गाडी संशयास्पद स्थितीत आढळून आली. पोलिसांनी तत्काळ वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये १५ जर्सी गायी आणि दोन गोरे दाटीवाटीने भरल्याचे निदर्शनास आले.



जनावरांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष

वाहनातील जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करण्यात आली नव्हती. तसेच वाहतुकीदरम्यान जनावरांना इजा होऊ नये, यासाठी आवश्यक मॅटिंगचीही व्यवस्था नव्हती. याशिवाय, जनावरांच्या वाहतुकीसाठी आवश्यक परवाना चालकाकडे नसल्याचे पोलिसांच्या तपासणीत समोर आले. त्यामुळे पोलिसांनी तातडीने कारवाई करत जनावरांची सुटका केली.

या प्रकरणी मुंबईतील कुर्ला येथील कुरेशी नगर, कसाईवाडा परिसरातील शकील अहमद शेख (वय ४४) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये अंदाजे दोन लाख ९८ हजार रुपये किमतीच्या जनावरांचा, तर नऊ लाख रुपये किमतीच्या आयशर वाहनाचा समावेश आहे. अशा प्रकारे एकूण ११ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अशोक शशिकांत गाढे यांच्या फिर्यादीवरून संबंधित संशयिताविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार साईनाथ रशिणकर करीत आहेत.

अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि संबंधित उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे, पोलीस हवालदार सुभाष बागुल, साईनाथ रशिणकर, पोलीस कॉन्स्टेबल अशोक गाढे तसेच होमगार्ड सागर आवटी, रवींद्र कोभारणे आणि महादू दिवे यांनी ही कारवाई केली.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग: अतिदक्षता विभाग • अपघात विभाग
डायलिसीस विभाग: सुपर स्पेशालिटी विभाग • न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग: मेडिसीन विभाग • अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट: स्पाईन सर्जरी • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.)
Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.)
Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25



दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २५१। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शनिवार १७/१०/२०२६ । पान- ६



टँकरसाठी अडवणूक नको; मागेल त्याला पाणी द्या!

प्रत्येक विभागाने नागरिकांच्या कामांना प्राधान्य द्यावे – आ. सत्यजित तांबे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुका विस्ताराने मोठा आहे. यंदा दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्यासह पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सर्वसामान्य नागरिकांना कोणतीही अडचण न येता मागेल त्याला तातडीने टँकर उपलब्ध करून द्या. लालफितीचा कारभार न करता स्थानिक परिस्थितीनुसार त्वरित निर्णय घ्या. तसेच जनतेचे प्रश्न प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्राधान्याने सोडवावेत अशा सूचना नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी प्रशासनाला दिल्या. यावेळी त्यांनी तालुक्यातील विविध गावांतील नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्या सोडविण्यास प्राधान्य दिले.

संगमनेर येथील प्रांताधिकारी कार्यालयात सर्व शासकीय विभागांची टंचाई आढावा बैठक आ. तांबे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी रामहरी कातोरे, शंकर पा. खेमनर, अविनाश सोनवणे, विलास कवडे, नवनाथ अरगडे, रमेश नेहे, मीराताई शेटे, दत्तात्रय कोकणे, विजय राहणे, अमोल शेलकर, निखिल पापडेजा, अमोल गुंजाळ, प्रांताधिकारी अरुण मुंडे, तहसीलदार धीरज मांजरे, उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, महावितरणचे कार्यकारी अभियंता सोनवणे यांच्यासह तालुक्यातील विविध गावांचे तलाठी, ग्रामसेवक आणि शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. सत्यजित तांबे म्हणाले की, मागील वर्षीच्या तुलनेत यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने संगमनेर तालुक्याचा समावेश टंचाईग्रस्त परिस्थितीच्या यादीत झाला आहे. यंदाचा दुष्काळ अत्यंत भयावह असून त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. मागणी करणाऱ्यांना टँकर उपलब्ध करून देताना कोणत्याही प्रकारची अडवणूक करू नये. स्थानिक परिस्थितीचा विचार करून अधिकाऱ्यांनी तात्काळ निर्णय घ्यावेत. पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि चारा यांचे नियोजन करावे, तसेच पाण्याचे स्रोत व जलसाठ्यांची काळजी घ्यावी. जनावरांच्या चारा छावण्यांबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तातडीने पाठपुरावा करून ठोस धोरण राबवावे. पुढील आठ दिवसांत कोणत्या भागात कोणती कामे तातडीने करणे आवश्यक आहे, याचा आराखडा तयार करावा दुष्काळामुळे तालुक्यात रोजगार हमीची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावी लागणार आहेत. शेतकरी अडचणीत असतानाच शेतमजुरांनाही रोजगाराचा प्रश्न भेडसावत आहे. शेतकऱ्यांसाठी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पाच हजार रुपयांच्या मदतीची घोषणा करण्यात आली असली तरी शेतमजुरांसाठी कोणतीही ठोस मदत जाहीर झालेली नाही. त्यामुळे शेतमजुरांच्या परिस्थितीचाही गांभीर्याने विचार करून त्यांना रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्रत्येक गावाने रोजगार हमीच्या कामांचे प्रस्ताव तातडीने तयार करावेत. या कामांतर्गत गावांमध्ये, वाड्या-वस्त्यांवर बंधारे, साखळी बंधारे आणि नाला खोलीकरणासारखी आवश्यक कामे हाती घ्यावीत, असेही त्यांनी सांगितले.

शिरसगाव धुपेतील आदिवासी बांधवांचा शिवसेनेत प्रवेश

आमदार खताळांच्या माध्यमातून प्रश्न सुटण्याचा विश्वास



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील शिरसगाव धुपे येथील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लागावेत, यासाठी आ.अमोल खताळ यांच्या माध्यमातूनच आपल्या समस्या सुटू शकतात, असा विश्वास व्यक्त करत गावातील असंख्य आदिवासी बंधू-भगिनींनी आ. अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

शिरसगाव धुपे येथील आदिवासी बांधवांनी शिवसेना-महायुतीचे आशिष कानवडे आणि भागवत कानवडे यांच्या माध्यमातून आमदार खताळ यांची भेट घेतली. यावेळी राजू धराडे, निवृत्ती कोरडे आणि ग्रामपंचायत सदस्या सुजाता धराडे यांनी गावातील समस्या मांडत त्या मार्गी लावण्याची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी अंकुश दिघे, रामनाथ भोजने, संतोष धराडे, संतोष दिघे, नामदेव धराडे, सखाराम दिघे, अमित कोरडे, रामा भुतंबरे, दीपक धराडे, गणेश धराडे, संजय धराडे, जालिंदर धराडे, अर्जुन धराडे, सागर धराडे अजित कोरडे, जयराम धराडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्या सुजाता धराडे, पूजा धराडे, सखुबाई धराडे, संगीता दिघे, संगीता कोरडे, चंद्रभागा कोरडे, लहानबाई धराडे, मंगला कोरडे, हिराबाई दिघे, मंदाबाई कोरडे, सोनाबाई धराडे आणि विजया धराडे, परिगाबाई धराडे,पार्वताबाई कांबळे, सुनंदा रधे, सुनंदा धराडे, भामबाई रेगडे यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

यावेळी आमदार खताळ म्हणाले, या तालुक्यातील तुमच्यासारख्या सर्वसामान्य जनतेने माझ्यासारख्या सर्वसामान्य शेतकऱ्याच्या मुलाला आमदार होण्याची संधी दिली आहे. ही संधी केवळ आमदार म्हणून मिरविण्यासाठी नसून जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मिळाली आहे. त्यामुळे शिरसगाव धुपे येथील पाणी, रस्ते आणि वीज यांसारखे मूलभूत प्रश्न मार्गी लावण्यासाठी माझा प्रयत्न राहणार आहेत. नदीकाठची काही गावे वगळता तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये पाणीटंचाई गंभीर बनली आहे. त्यामध्ये शिरसगाव धुपे गावाचाही समावेश आहे. सातगाव पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून गावाला पाणी मिळत असले, तरी शिरसगाव धुपे हे उंचावर असल्यामुळे नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा होण्यात अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी, गावातील पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. या समस्येवर मार्ग काढून नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. गेल्या ४० वर्षांत अनेकांनी स्वतःचा स्वार्थ साधताना सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. मात्र, सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील तरुण म्हणून मला जनतेने काम करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे कोणत्याही ठेकेदाराचे हित जपण्याऐवजी सर्वसामान्य जनतेच्या हिताची कामे करणे, हेच माझे उद्दिष्ट आहे.

प्रत्येक गावातील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी जलजीवन योजना सुरू करण्यात आली. मात्र, या योजनेचा उपयोग सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्याऐवजी ठेकेदारांना पोसण्यासाठी झाल्याची टीकाही आमदार अमोल खताळ यांनी केली.











